## निशाणी क्र. ३९ वरील आदेश

१. प्रस्तुत अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश १ नियम १० अन्वये दाखल केलेला आहे.

२. वादीचे अर्जातील कथन असे आहे की, वादी यांनी सदरचा दावा सरसनिरस मानाने वाटप होऊन मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. वादी यांनी प्रतिवादी क्र. १ यांना दावा दाखल करण्यापुर्वी दि. ०३/०९/२०२० रोजी नोटीस दिली होती. ही नोटीस दिल्यानंतर प्रतिवादी क्र. २ यांनी दावा मिळकत सर्व्हे नं. ८७/४ ही मिळकत रक्कम रु. १४,००,०००/– स्वीकारुण श्री. अजय जनार्दन म्हात्रे व अभिजित जनार्दन म्हात्रे यांना दि. ०९/०९/२०२० रोजीच्या खरेदी दस्ताने विकलेली आहे. दावा दाखल केल्यानंतर या बाबत वादींना माहिती झाली आहे त्यामुळे विकत घेणार श्री. अजय जनार्दन म्हात्रे व अभिजित जनार्दन म्हात्रे यांना दाव्यात प्रतिवादीपणात समावेश करणे आवश्यक आहे. त्यामुळे वादी यांचा अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती वादी यांनी केली आहे.

३. प्रतिवादी यांनी आपले म्हणणे दाखल केले. त्यांनी आपले म्हणण्यामध्ये असे नमुद केले की, वादीचा अर्ज खरा व कायदेशीर नाही. अर्जात नमुद खरेदीखत दावा दाखल करण्यापुर्वी झालेले आहे. वादीला या खरेदी खताबाबत माहिती होती त्यामुळे वादीचा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा.

४. वादीचा अर्ज प्रतिवादीचे म्हणणे व वादी व प्रतिवादी वकीलांचा युक्तीवाद ऐकला. दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी यांनी सदरचा दावा वाटपाकरीता व जाहीर ठराव मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. वादीचे कथनाप्रमाणे वादीने प्रतिवादीला दि. ०३/०९/२०२० रोजी नोटीस दिल्यानंतर प्रतिवादीने सदरचे खरेदीखताचा दस्त नोंदविलेला आहे. या खरेदीखताबाबत वादीला दावा दाखल केल्यानंतर माहिती मिळाली आहे. अशा परिस्थितीत दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्याकरीता तसेच वादी व प्रतिवादी यांचेमधील वादाचे कायमस्वरुपी निराकरणाकरीता खरेदी घेणार श्री. अजय जनार्दन म्हात्रे व अभिजित जनार्दन म्हात्रे यांना दाव्यात पक्षकार करणे आवश्यक आहे. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी विहित मुदतीत प्रतिवादी म्हणुन श्री. अजय जनार्दन म्हात्रे व श्री.अभिजित जनार्दन म्हात्रे यांचा समावेश करावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by WABALE RAMDAS DAULAT
Date: 2022.10.14 17:42:00 -0800

खालापूरः **(आर.डी.वाबळे)**
दि. १४/१०/२०२२ दिवाणी न्यायाधिश क.स्तर खालापूर

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| (a)Name of the Stenographer | : | M. S. Shirgire, Steno. (L.G.) |
| (b)Court | : | Shri. R. D. Wabale<br>C.J.J.D. & J.M.F.C.,<br>Khalapur |
| (c) Date of Judgment/Order | : | 14/10/2022 |
| (d) Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 14/10/2022 |
| (e) Judgment/Order uploaded on | : | 15/10/2022 |